# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शनिवार, दिनांक ०१ एप्रिल, २०१७ / चैत्र ११, १९३९ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री** | |
| **(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(३) पर्यावरण मंत्री** | |
| **(४) पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५७**

---

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरुंनी निधीचा गैरवापर केल्याबाबत

**(१) * २९३२१ श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरुंनी विविध ठिकाणी केलेल्या २३ दौऱ्यासाठी २१ लाख ६७ हजार २८४ रुपयांचा गैरवापर केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार गैरवापरावर प्रतिबंध घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) बाबत प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात नर्सरीच्या प्रवेशाकरिता प्रवेशस्तर शाळांनीच ठरविण्याबाबत**

**(२) * ३०६२१ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शालेय शिक्षण विभागाच्या २५ टक्के प्रवेशासंदर्भात जाहिर झालेल्या शासन निर्णयामध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेशस्तर शाळांनीच ठरवावा, या सूचनेचा शाळांनी चुकीचा अर्थ लावल्याने नर्सरीचे वर्ग उपलब्ध असूनही पहिलीपासूनच प्रवेशाच्या कोटयाच्या जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या वयानुसार नर्सरीत प्रवेश हवा आहे, त्यांना प्रवेश मिळणे कठीण झाल्याने सन २०१६-१७ या वर्षात प्रवेशाच्या जागा कमी झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रवेशापासून कोणीही विद्यार्थी वंचित राहणार नाही याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
दिनांक १० जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयातील ब(२) नुसार प्रवेशाकरीता प्रवेशस्तर शाळांनीच ठरविण्याबाबत नमूद करण्यात आले आहे.
(२) होय.
(३) सदर प्रवेशाची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्याकरीता दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला असून त्यानुसार २५ टक्के प्रवेशास पात्र झालेल्या मुलांना संबंधित शाळेने प्रवेश देणे बंधनकारक करण्यात आले आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात इयत्ता पहिलीच्या प्रवेशासाठी वयोमर्यादेची अट घातल्याबाबत**

**(३) * ३०१०९ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने सन २०१५ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार इयत्ता पहिलीच्या प्रवेशासाठी शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ मध्ये दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी बालकाचे वय ५ वर्षे, सन २०१७-१८ मध्ये ५ वर्षे ४ महिने पूर्ण, सन २०१८-१९ मध्ये ५ वर्षे ८ महिने पूर्ण तर सन २०१९-२० मध्ये ६ वर्षे पूर्ण असे निश्चित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ३१ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयाचा विचार केल्यास बालकाचे वय ६ वर्षे २ महिने होत असल्याने वय ५ वर्षे ४ महिने पूर्ण झालेल्या बालकांना येत्या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेता येणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त निर्णयामुळे पालकांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दुर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोंदिया जिल्हयातील शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४) * २९१०३ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील माध्यमिक शिक्षण विभागात अधिकारी तसेच शिक्षण अधिकारी यांचेसह अनेक महत्वाची पदे रिक्त असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माध्यमिक शिक्षण अधिकारी कार्यालयात मागील एक वर्षापासून कायमस्वरुपी शिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिकारी नसल्याने मुख्याध्यापकांचा कामाचा ताण वाढला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) शिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे. उपशिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.गोंदिया या पदावर दिनांक ८/७/२०१६ च्या शासन आदेशान्वये अधिकाऱ्याची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली होती. मात्र संबंधित अधिकाऱ्याने पदोन्नतीस नकार दिल्यामुळे सदर पद रिक्त राहिले आहे. उपशिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य हवामान बदल कृती आराखड्याच्या अंमलबजावणीबाबत**

**(५) * २६९६७ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २५७२५ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या वातावरणातील बदल कृती आराखड्याच्या मान्यतेसाठी प्रस्ताव तयार करण्यात आला असून तो मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावास मा.मंत्रिमंडळाची मान्यता प्राप्त झाली आहे काय, प्रस्तुत आराखड्याचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने राज्य शासनाने हवामान बदल कृती आराखड्याच्या अंमलबजावणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, उपरोक्त प्रकरणी कार्यवाही केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. रामदास कदम :** (१), (२) व (३) होय, मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव प्रस्तावित आहे. जागतिक हवामान बदलाचा राज्यावर होणा-या संभाव्य परिणामाबाबत तज्ञ संस्थेकडून शास्त्रोक्त अहवाल तयार करून घेण्यात आलेला असून त्यानुसार राज्यात करावयाच्या उपाययोजनांच्या अनुषंगाने संबंधित विभागांचे अभिप्राय प्राप्त करुन निश्चित कृति आराखडा तयार करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

----------------

## वसई (जि.पालघर) तालुक्यातील सर्वशिक्षा अभियानांतर्गत बांधण्यात आलेल्या बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६) * ३०२८३ श्रीमती विद्या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २५९४० ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील सर्वशिक्षा अभियानांतर्गत सन २००७-२००८ मध्ये बांधण्यात आलेल्या जिल्हा परिषदेच्या २४ ठिकाणच्या शाळेच्या इमारतीच्या बांधकामासाठी रुपये १ कोटी ६० लाख ६१ हजार खर्च करूनही वर्गखोल्यांचे काम पूर्ण न झाल्यामुळे सदर इमारतीच्या बांधकामात गैरव्यवहार झाला असल्याने विधानपरिषदेत प्रश्न उपस्थित करून सदर प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास सभागृहात दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई तालुक्यात जिल्हा परिषदेच्या विविध शाळेमध्ये वर्गातील लाद्या उखडलेल्या असून छप्पर गळणे, वीज पुरवठा बंद असणे, वर्गातील भिंती मोडकळीस आलेल्या असून वर्गांना बांबूचा टेकू देवून अशा वर्गखोल्यांमध्ये विद्यार्थ्यांना बसवणे, विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचा पुरवठा न होणे, या वर्गखोल्यांमध्ये विद्यार्थ्यांना अत्यावश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देऊन उक्त समस्या मार्गी लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

वसई (जि.पालघर) तालुक्यात सर्वशिक्षा अभियानांतर्गत बांधलेल्या शाळांच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने याबाबत जिल्हा स्तरावरून समितीमार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली असून सविस्तर चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे, सोलापूर तसेच नगर जिल्हयातील शिक्षकांना थकित वेतन देण्याबाबत**

**(७) * २७२७५ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, सोलापूर तसेच नगर जिल्हयातील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०१६ या दोन महिन्याचे वेतन मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सदर शिक्षकांचे थकित व सध्या सुरु असलेल्या महिन्याचे वेतन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. सोलापूर जिल्हयातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांचे वेतन अदा करण्यात आले आहे. अहमदनगर जिल्हयातील शिक्षकांचे वेतन अपुऱ्या निधीमुळे तर पुणे जिल्हयामधील नियमित वेतनासाठी तरतूद कमी पडल्यामुळे शिक्षकांचे वेतन अदा करण्यात आलेले नाही. यासाठी दिनांक ४/३/२०१७ च्या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करण्यात आला असून वेतन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**म्हाळम्हसोला (जि.यवतमाळ) येथे प्राथमिक शाळेच्या बांधकामात व गणवेश वाटपात अनियमितता झाल्याबाबत**

**(८) * ३०६४७ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाळम्हसोला (जि.यवतमाळ) येथे प्राथमिक शाळेच्या बांधकामात व गणवेश वाटपात अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद यवतमाळ येथील शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी सदर प्रकरणाकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या खेळाडूला आर्थिक मदत देण्याबाबत

**(९) * २९६१३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोईवाडा (मुंबई) येथील बीडीडी चाळीत राहणारे सुरज देवकुळे हे राष्ट्रीय पातळीवर पॉवर लिफ्टींग स्पर्धेतील सुवर्ण पदक विजेते आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने हलाखीचे जीवन जगत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खेळाडूला प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि अशा खेळाडूने विहीत पध्दतीने अर्ज केल्यास निकषांनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या कॉन्व्हेंटच्या शाळांमध्ये २५ टक्के कोटा वंचित घटकाच्या मुलांकरीता राखीव ठेवण्याबाबत**

**(१०) * २७०६१ प्रा.अनिल सोले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विनायकराव मेटे, ॲड.जयदेव गायकवाड : तारांकित प्रश्न क्रमांक २५१६८ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या कॉन्व्हेंटच्या शाळामध्ये २५ टक्के कोटा वंचित घटकांच्या मुलांकरीता राखीव ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रक्रियांची अंमलबजावणी लागू करुन प्रवेश न देणा-या शाळावर व संस्थावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत वंचित व दुर्बल घटकातील बालकांसाठी (विनाअनुदानित अल्पसंख्यांक/मदरसा/वेदिक पाठशाळा वगळता) सर्व विनाअनुदानित शाळात २५ टक्के जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत.

(२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत २५% प्रवेशाची अंमलबजावणी सन २०१२-१३ पासून करण्यात आलेली असून सदर प्रवेशाची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्याकरिता दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला असून त्यानुसार २५% प्रवेशास पात्र झालेल्या मुलांना संबंधित शाळेने प्रवेश देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सदोष संचमान्यतेतील दुरुस्ती करण्याबाबत

**(११) * २८४८३ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नव्या निकषानुसार करण्यात आलेल्या संचमान्यता सदोष आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदोष संचमान्यतेवर आक्षेप नोंदवणाऱ्या शाळांची दखल घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, नव्या निकषांमुळे आरटीई आणि एमईपीस कायद्याचे उल्लंघन होत असल्यास, शासनाचे धोरण काय व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) केंद्र शासनाचा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदीनुसार शासन निर्णय दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ व दिनांक ८ जानेवारी, २०१६ निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यात स्वच्छ भारत अभियानाच्या अपयशाबाबत

**(१२) * २९३८५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वच्छ भारत अभियानांतर्गत मराठवाडयातील जिल्हे शौचालय बांधकामाच्या योजनेत अपयशी ठरल्याचे सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान स्वच्छ भारत मिशनच्या अहवालात प्रसिध्द करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शौचालय बांधकामाच्या योजनेत अपयशी ठरलेल्या जिल्हयाच्या जबाबदार अधिकारी/कर्मचारी व यंत्रणा यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शिक्षण उपसंचालकांच्या कार्यालयात विधी अधिकारी (Legal Officer) व अधिनस्त पदे निर्माण करण्याबाबत**

**(१३) * २७१६६ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामध्ये जिल्हा परिषद सेवेतील व खाजगी संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सेवा विषयक कामकाज केले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक शिक्षकांची सेवाविषयक प्रकरणे संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व शालेय शिक्षण संस्था चालकांमार्फत न्यायालयात दाखल केली जातात अशा प्रकरणांच्या सुनावणीसाठी संबंधित शिक्षण अधिकारी व अन्य अधिकाऱ्यांना न्यायालयात उपस्थित रहावे लागत असून अधिकाऱ्यांना कायदे विषयक बाबींचे ज्ञान नसल्याने त्याचा प्रशासकीय कामकाजावर परिणाम होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासाठी संबंधित शिक्षण उपसंचालकाच्या कार्यालयात न्यायालयीन कामकाज पाहण्यासाठी विधी अधिकारी (Legal Officer) व अधिनस्त पदे निर्माण करण्यात यावीत, अशी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची सन २००० पासून मा.मुख्यमंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री व प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचेकडे मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) यासंदर्भातील उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार विभागीय उपसंचालक, बृहन्मुंबई, नागपूर व औरंगाबाद या कार्यालयात विधी अधिकाऱ्यांची प्रत्येकी एक अशी एकूण ३ पदे निर्माण करण्यात आली असून, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या ३ उमेदवारांपैकी एक उमेदवार हजर झाले असता, त्यांची पदस्थापना करण्यात आलेली आहे. अन्य दोन उमेदवार हजर

न झाल्याने, सदर दोन पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पुन्हा मागणी पत्र पाठविण्यात आलेले आहे. तसेच आयुक्त, शिक्षण कार्यालय व उर्वरित विभागीय उपसंचालक कार्यालयात प्रत्येकी एक याप्रमाणे आणखी सहा पदे निर्माण करण्याबाबत आयुक्त, शिक्षण यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**अल्पसंख्यांक शाळांमध्ये पट संख्येमुळे शिक्षकांची पदे कमी झाल्याबाबत**

**(१४) * २९५२७ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अल्पसंख्यांक शाळांमध्ये दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ व दिनांक ०८ जानेवारी, २०१६ च्या संचमान्यतेच्या निकषानुसार पटसंख्येच्या अभावी शिक्षकांची पदे कमी होणे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पद कमी झाल्यावर अतिरिक्त शिक्षकांना समायोजनापर्यंत No Work No Pay चा शासन निर्णय असून उक्त निकष अन्य शाळांना नसल्याने अल्पसंख्यांक शाळामध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांमध्ये अन्यायाची भावना निर्माण झाली तसेच सदर शासन निर्णय रद्द करणेबाबत शिक्षक आघाडी, अमरावती विभाग, अमरावती यांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पावसाळी अधिवेशन २०१६ मध्ये आदेश रद्द करणेबाबत मा. शिक्षण मंत्र्यांनी सभागृहात आश्वासन देवूनही सदर आदेश रद्द करणेबाबतचे सुधारीत शासन निर्णय निर्गमित झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) हे खरे नाही, अशी मागणी शासनास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तसेच समायोजनाच्या कारणास्तव कोणत्याही अल्पसंख्यांक संस्थेतील शिक्षकाचे वेतन बंद करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर शासन निर्णय रद्द करण्याबाबत कोणताही प्रस्ताव शासन विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**एशियाटीक ग्रंथालयाला ग्रंथसंपादाचे डिजिटायजेशन करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१५) * २७४६१ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह देशाचे वैभव आणि सांस्कृतिक, वैचारिक समृध्दीचे ज्ञानभंडार असलेले "एशियाटीक ग्रंथालय" आर्थिक अडचणीत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ग्रंथालयात २३ हजार पुस्तकांचे डिजिटायजेशनचे काम पूर्ण झाले असून २५ हजार पुस्तकांचे डिजिटायजेशन अनुदान न मिळाल्याने करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने २० कोटीचा निधी एशियाटीक ग्रंथालयाला देण्याबाबत सांस्कृतिक कार्य विभाग समितीच्या सूचना असून, विविध सामाजिक संस्था या सोसायटीला आर्थिक मदत देत असताना शासनाने निधी उपलब्ध करुन दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनेक दुर्मिळ व निरंतर मुल्य असलेल्या ग्रंथसंपदाचे डिजिटायजेशन करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अध्यक्ष, एशियाटीक सोसायटी, मुंबई यांचे एशियाटीक सोसायटीचा ग्रंथालय डिजिटायजेशन प्रकल्प भाग-२ साठी निधी मिळणेबाबत मा.अ.मु.स. उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांना लिहिलेले दिनांक ०८/०२/२०१७ रोजीचे पत्र शासनास प्राप्त झाले आहे.

(२) अध्यक्ष, एशियाटीक सोसायटी, मुंबई यांनी मा.प्रधान सचिव यांना लिहिलेल्या दिनांक ०८/०२/२०१७ च्या पत्रानुसार ३१ जानेवारी, २०१७ अखेरपर्यंत २३,४३७ दुर्मिळ व मौल्यवान ग्रंथांचे डिजिटायजेशन पूर्ण करण्यात आलेले आहे, असे पत्राचे अवलोकन केले असता निदर्शनास येते.

(३) हे खरे नाही.

मा. मंत्री, वित्त व नियोजन यांनी सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये 'मुंबईतील प्रसिध्द एशियाटीक ग्रंथालयाचे डिजिटायजेशन करण्यासाठी सन २०१५-१६ मध्ये नियोजन विभागांतर्गत अवितरीत नियतव्ययापैकी ५ कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे. असे घोषित केले होते. विधीमंडळाच्या डिसेंबर, २०१५ च्या हिवाळी अधिवेशनात निधी अर्थसंकल्पित करण्यात आला. मार्च, २०१६ अखेर एशियाटीक सोसायटीस वितरीत करण्यात आला आहे.

(४) मा. मंत्री, वित्त व नियोजन यांनी केलेल्या घोषणेनुसार सन २०१५-१६ मध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०४/०२/२०१६, ०१/०३/२०१६ व ३०/०३/२०१६ शासन निर्णयानुसार एकूण रुपये ५.०० कोटी निधी एशियाटीक सोसायटी, मुंबईच्या ग्रंथालयाच्या डिजिटायजेशनसाठी ग्रंथालय संचालनालयामार्फत उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दैठण (सा.) (ता.केज, जि.बीड) येथील पाणीपुरवठा योजना व विविध विकास कामातील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(१६) * ३०५५५ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दैठण (सा.) (ता.केज, जि.बीड) येथील पाणीपुरवठा योजना व विविध विकास कामातील गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी उपायुक्त रोहयो यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशी समितीने केलेल्या प्रत्यक्ष कामाच्या पाहणीचा अहवाल शासनाला सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहारातील दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) नाही, चौकशी समितीने गट विकास अधिकारी पंचायत समिती केज व पैठण (सावळेश्वर) येथे प्रत्यक्ष भेट दिली असून चौकशी सुरु आहे.

(४) सदर प्रकरणात चौकशीधीन कामाचा कालावधी २००५ ते २०१६ इतका प्रदिर्घ असल्याने चौकशीची व्याप्ती मोठी असल्याने काही कालावधी लागणे अपरिहार्य आहे.

-----------------

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मृद पोलाद (डी.आय.) पाईपकरिता नवीन दरसूची लागू करण्याबाबत**

**(१७) * २६९७६ श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाणीपुरवठा योजनेकरिता वापरण्यात येणाऱ्या मृद पोलाद (डी.आय.) पाईपचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या दरसूचीमध्ये तफावत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मृद पोलाद (डीआय) पाईपकरिता लागू असलेली दरसूची उत्पादक कंपनीच्या दरांवर आधारित असून पाईप पुरवठाकरिता लागणारे कर व इतर बाबींचा (erection, handling, fixing, testing) समावेश नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नविन दरसूची लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या दरसूचीतील दर हे प्राधिकरणाच्या दरसूचीतील दरापेक्षा काही प्रमाणात जास्त आहेत.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरसूचीमध्ये मृदू पोलाद (डी.आय.) पाईप पुरवठ्याकरिता असलेल्या दरामध्ये एक्साइज ड्युटी व ऑक्ट्रॉय/एल.बी.टी. वगळता इतर सर्व करांचा समावेश करण्यात आलेला आहे. तथापि, या दरामध्ये erection, handling, fixing, testing यांचा समावेश नाही.

(३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरसूचीमध्ये डी.आय. पाईप्स पुरवठ्याचे दर व डी.आय. पाईप्स lowering, laying, jointing and testing करीता स्वतंत्र दराचा समावेश केलेला आहे. त्यामुळे नव्याने दरसूची लागू करण्याची आवश्यकता नाही. तसेच प्राधिकरणाच्या दरसूचीबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील खाजगी प्राथमिक शाळेतील तसेच कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना वेतन देण्याबाबत

**(१८) * २६८२० श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षक तसेच कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना मागील तीन महिन्यांपासून वेतन मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांना तीन महिने वेतन न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार शिक्षकांना वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) पुणे शहरातील खाजगी प्राथमिक शाळेतील योजनांतर्गत योजनेखाली असलेल्या शिक्षकांचे वेतन ऑक्टोबर, २०१६ पर्यंत अदा करण्यात आले असून निधी उपलब्ध नसल्यामुळे नोव्हेंबर, २०१६ पासूनचे वेतन प्रलंबित आहे.

(३) व (४) राज्यातील खाजगी शाळेवरील शिक्षकांचे पुरेशा अनुदानाअभावी थकित राहिलेले वेतन अदा करण्यासाठी शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक ४/३/२०१७ अन्वये अनुदान वितरीत करण्यात आले असून शिक्षकांचे थकित वेतन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यातील विनाअनुदानित शाळांच्या अनुदानाबाबतच्या अटी आणि शर्ती रद्द करण्याबाबत

**(१९) * २७१५३ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे : तारांकित प्रश्न क्रमांक २३९८६ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) १६ वर्षे विनाअनुदानित सेवा करत असलेल्या शिक्षकांना दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ च्या शासन आदेशाने २० टक्के अनुदान देण्याचा आदेश पारित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शासन आदेशामध्ये मुद्दा क्र.३ मध्ये इयत्ता ९ वी व १० वी चा निकाल १०० टक्के असावा अशी अट घालण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विनाअनुदानित शाळांना अनुदानावर आणण्यासाठी १०० टक्के निकालाची अट असल्याने ती कमी करावी म्हणून आझाद मैदान, मुंबई येथे दिनांक १७ व १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी लोकप्रतिनिधींनी आमरण उपोषण केले होते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त निकालाची अट रद्द व्हावी म्हणून शिक्षक संघटना व लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत पाठपुरावा सुरु असून सदर शासन आदेशामध्ये असलेली १०० टक्के निकालाची अट बदलून त्याबाबतचे शुध्दीपत्रक काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) शासन निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये दिनांक १४ जून, २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) शैक्षणिक गुणवत्ता राखण्याच्यादृष्टीने सदर तरतूदीचा समावेश करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांतर्गत शारिरीक शिक्षण महाविद्यालयात गैरव्यवहार होत असल्याबाबत**

**(२०) * २९२३५ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठांतर्गत शारिरीक शिक्षण महाविद्यालये केवळ कागदोपत्री चालविली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त महाविद्यालये परिक्षापुरतीच सुरु करुन अन्य वेळी बंद असूनही विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संगनमत करुन पदव्याही प्रदान केल्या जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच शारिरीक शिक्षण महाविद्यालय संचालकांविरुध्द कारवाई करुन ज्या विद्यार्थ्यांना पदव्याचे वाटप करण्यात आले आहे अशा विद्यार्थ्यांच्या पदव्या परत घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील कातकरी कुटुंबे रास्त भाव दुकान धान्यापासून वंचित असल्याबाबत

**(२१) * २९२६३ श्री.रविंद्र फाटक, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यात २८२ कातकरी कुटुंबे शासकीय धान्य वितरण व अंत्योदय योजनेतून देण्यात येणाऱ्या रास्त भाव धान्यापासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून शूर झलकारी एकता महासंघ, सचिव यांनी डहाणू पुरवठा अधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील तीन वर्षापासून २८२ कातकरी कुटुंबियांना कुठल्याही प्रकारे शासकीय धान्य मिळत नसल्याने हलाखीचे जीवन जगणा-या गरजू, गरीब कातकरी कुटुंबांना स्थलांतर व उपासमारीला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जबाबदार असणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अंशत: खरे आहे.

मौजे तवा व निंबापूर, ता.डहाणू येथील आदिम जमात कातकरी कुटुंबाच्या २४ शिधापत्रिकाधारकांना अंत्योदय अन्न योजनेचे धान्य मिळत नसल्याबाबत सदर संस्थेचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) सदर २४ कुटुंबांना शिबीर आयोजित करुन अंत्योदय अन्न योजनेच्या विभक्त शिधापत्रिका देण्यात आलेल्या आहेत. सदर २४ शिधापत्रिकाधारकांना त्यांच्या मूळ एकत्रित कुटुंबांच्या नावे असलेल्या शिधापत्रिकांवर कुटुंबाचे एकत्रित धान्य मिळत आहे. यामुळे सदर शिधापत्रिकाधारकांची उपासमार झालेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जळगांव व धुळे जिल्हयात स्वच्छता अभियानाकडे दुर्लक्ष झाल्याबाबत**

**(२२) * २९५८१ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव व धुळे जिल्हयात मागील दोन ते अडीच महिन्यांपासून स्वच्छता अभियान राबविण्यात येऊन केंद्र शासनाच्या समितीने प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर स्वच्छता अभियानाकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वच्छता अभियान राबविणा-या महापालिका प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सर्वशिक्षा अभियानातून वस्तीशाळा सुरु करण्याबाबत**

**(२३) * ३०७७३ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाने २००२ मध्ये सर्व शिक्षा अभियानातून वस्तीशाळा सुरु करण्याच्या धोरणात्मक निर्णयास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१३ मध्ये बृहत आराखडयातून बीड जिल्हयात २२१ तर केज तालुक्यात २८ वस्तीशाळा सुरु करण्यास मंजूरी दिली असून मागील ३ वर्षे या शाळांना इमारत उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना प्राथमिक सुविधा मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) व (३) बृहत आराखडयानुसार बीड जिल्हयातील २४९ नवीन प्राथमिक शाळांना मंजूरी दिली आहे. त्यापैकी २२१ शाळा सुरु करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये केज तालुक्यातील २८ शाळांचा समावेश आहे. सदर शाळांच्या इमारती वार्षिक कृती आराखडयात प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याबाबत**

**(२४) * २९९३८ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या १३९ शाळांना मुख्याध्यापक नसून शासनाकडून शाळा डिजिटल करण्याची योजना राबविली जात आहे तसेच ग्रामिण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांची अवस्था बिकट असल्याने विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भिती ग्रामिण भागातील जनतेकडून व्यक्त होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) मुख्याध्यापकाची पदे रिक्त आहेत हे खरे आहे. तथापि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेतलेली आहे.
(२) व (३) मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त कार्यभार सेवाजेष्ठ शिक्षकांकडे सोपविण्यात येवून कामकाज करण्यात येत आहे. राज्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीसाठी दिनांक २३ फेब्रुवारी, २०१७ पर्यंत आचारसंहिता असल्याने पदोन्नती प्रक्रिया राबविता आली नाही. सदर प्रक्रिया आता पूर्ण करण्यात येत आहे.

----------------

**ठाणे व कल्याण येथे मुंबई विद्यापीठाची दोन्ही उपकेंद्र सुरु करण्याबाबत**

**(२५) * २७२३४ श्री.संजय दत्त :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व कल्याण येथे मुंबई विद्यापीठाच्या उपकेंद्रामध्ये दोन वर्ष होवूनही प्रशासकीय विभाग सुरु झाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या उद्देशाने मुंबई विद्यापीठाने सदरील दोन उपकेंद्र सुरु केली त्याचा जिल्हयातील विद्यार्थ्यांना फायदा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठाणे व कल्याण येथे मुंबई विद्यापीठाची दोन्ही उपकेंद्रे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) ठाणे उपकेंद्र सुरु झाले असून बीएमएस-एमबीए आणि बीबीए-एलएलबी हे दोन अभ्यासक्रम सुरु आहेत. कल्याण उपकेंद्राचे बांधकाम पूर्णत्वास आले असून या शैक्षणिक वर्षापासून स्कूल ऑफ इंजिनीअरिंग सायन्सचे अभ्यासक्रम राबविले जाणार आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील वक्फ बोर्डाच्या मालमत्तांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२६) * २७२७६ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वक्फ बोर्डाच्या मालमत्तांमध्ये गैरव्यवहार होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले असून याबाबत आढावा घेऊन उपाययोजना करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आढावा घेऊन निर्णय घेण्यात आला आहे काय, आढाव्यात काय आढळून आले व त्यावर घेण्यात आलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) अशंत: खरे आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळातील कथित गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी चौकशी आयोग अधिनियम, १९५२ (१९५२ चा ६०) मधील तरतुदीनुसार शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण १०/०७/ प्र.क्र.१७५/ ल-३, दिनांक ९/१०/२००७ अन्वये श्री.ए.टी.ए.के. शेख, सेवानिवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधिश या एक सदस्यीय चौकशी आयोगाची स्थापना करण्यात आली होती. सदर चौकशी आयोगाने चौकशीअंती सादर केलेला चौकशी अहवाल व त्यानुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीचा कृती अहवाल दिनांक १०/०४/२०१५ रोजी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात पटलावर ठेवण्यात आलेला आहे. आयोगाने अहवालात नमूद केलेल्या प्रकरणांमध्ये तसेच त्याच्याशी समान असलेल्या अन्य प्रकरणांमध्ये बेकायदेशीरित्या विक्री, अदला-बदल इ. झालेल्या वक्फ मालमत्ता वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या वक्फ मंडळाला सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सदरच्या कामी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाला सहाय्य करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली १ उपजिल्हाधिकारी, २ तहसिलदार आणि २ नायब तहसिलदार यांचा समावेश असलेल्या एका कृती दलाची स्थापना करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सद्य:स्थितीत या कृतिदलासाठी आवश्यक पदनिर्मिती करण्यात आलेली असून, सदर पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासंदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महाविद्यालयात शिक्षण शुल्क कमी करण्याबाबत

**(२७) * २९१४९ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ९० टक्के महाविद्यालयांना शिक्षण शुल्क नियामक प्राधिकरणाने दिलेल्या सूचनेमुळे सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात तंत्रनिकेतन, नर्सिंग, फार्मसी अभ्यासक्रमांचे शुल्क सरासरी ४० टक्क्यांनी कमी होणार असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालयांनी सादर केलेल्या सन २०१५-१६ चा ताळेबंद आणि समितीच्या सदस्यांना महाविद्यालयांच्या तपासणीत शिपाई, चालक यांच्या अतिरिक्त जागा दाखविणे, आस्थापना खर्च (वीज बिल इत्यादी) वेतन खर्चापेक्षा जास्त दाखवणे, इतर उत्पन्न लपवणे, शैक्षणिक सुविधा फक्त कागदावर दाखवणे तसेच एकाच शिक्षकावर दोन शिफ्ट चालविणे इत्यादी त्रुटी आढळून आल्यामुळे घट करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन व्यवस्थापनेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२)  शुल्क कमी होण्यामध्ये मुख्य कारण हे कर्मचाऱ्यांना बँकेव्दारे वेतन अदा न करता रोख स्वरुपात देणे, शिक्षकीय पदांना मान्यता न घेणे, वेतन व वेतनेतर खर्चामध्ये तफावत असणे या सारख्या बाबींचा प्रामुख्याने समावेश आहे.

(३) व (४) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मध्ये दोषी संस्थांविरुध्द कारवाई करण्याचे प्रावधान असून त्याप्रमाणे शुल्क नियामक प्राधिकरणाकडून कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील वसतिगृहामधील मेस बंद असल्याबाबत

**(२८) * २९३४१ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील वसतिगृहामध्ये असलेली खानावळ (मेस) मागील वर्षापासून बंद असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्षारयुक्त पाण्यामुळे विद्यापीठाच्या वसतिगृहात २२ विद्यार्थ्यांना किडनी स्टोन झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार विद्यापीठातील विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेता खानावळ सुरु करण्याबाबत तसेच स्वच्छ व पुरेसे पाणी पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

विद्यापीठाच्या परिसरामध्ये सेंट्रल मेस चालविण्यात येत असुन सद्य:स्थितीमध्ये सर्व विद्यार्थ्यांना मेस खुली आहे व वसतिगृहांमधील विद्यार्थी याचा लाभ घेत आहे. मेसमध्ये विद्यार्थ्यांना चहा नाष्टा व जेवणाची सोय केलेली आहे. तसेच मुलांचे वसतिगृह क्र. ०१ येथे आर.ओ. जलशुध्दीकरण प्रकल्प बसवलेला आहे. इतर सर्व वसतिगृहांमध्ये फिल्टरद्वारे शुध्द पाणी पुरविले जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्याच्या क्रीडा परिषदेचे गठन करण्याबाबत**

**(२९) * २६९६८ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २४०३१ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या क्रीडा धोरणानुसार महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेचे पुनर्गठन करण्यासंबंधीच्या व निर्णय प्रक्रियेच्या अंतिम टप्प्यावर असलेल्या प्रस्तावावरील शासनाचा विचार पुर्ण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रस्तृत क्रीडा परिषदेचे गठन करणेबाबत कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेचे पुनर्गठन करण्याच्या प्रस्तावावर अंतिम निर्णय केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील पाणी टंचाईवर उपाययोजना करण्याबाबत**

**(३०) * ३०६५८ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील भुरकी, पोहणा, डोर्ली, कळमना, कुर्ली, मानकी, नायगाव, नांदेपेरा, पळसोनी इत्यादी गावात पाणी टंचाई असून दुषित पाण्याचा पुरवठा केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन पाणीपुरवठा पुर्ववत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**लोणार (जि.बुलढाणा) येथील अतिप्राचिन ऐतिहासिक वास्तुंचे जतन व संवर्धन करण्याबाबत**

**(३१) * २९७५५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार (जि.बुलढाणा) येथील अतिप्राचिन ऐतिहासिक वास्तुंचे जतन करणे, पुरातत्व विभागाकडून होत नसल्याने त्यांची पडझड होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहिल्याबाई होळकर अन्नछात्र, दैत्यसुदन-मंदिर शहर परिसरातील राष्ट्रीय स्मारके या वास्तू नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निधीची तरतूद करुन पुरातन वास्तूंचे जतन व संवर्धन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**तिरोडा (जि.गोंदिया) तालुक्यातील विद्यार्थी परिक्षेपासुन वंचित राहिल्याबाबत**

**(३२) * २७२२४ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिरोडा (जि.गोंदिया) तालुक्यातील ३६ विद्यार्थ्यांचे नवोदय परिक्षेचे फार्म गटशिक्षणाधिकारी यांनी वेळेत सादर न केल्यामुळे विद्यार्थी परिक्षेपासुन वंचित राहिल्याचे दिनांक ०९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना परिक्षेपासुन वंचित ठेवणाऱ्या गटशिक्षण अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी श्री.एल.एन.मोहबंसी, उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद गोंदिया यांनी दिनांक १० जानेवारी, २०१७ रोजी चौकशी केली असून, तिरोडा पंचायत समितीतील श्री.एस.सी.शहारे, कनिष्ठ विस्तार अधिकारी (शिक्षण) हे प्रस्तुत प्रकरणी दोषी असल्याचे आढळले असून त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई सुरु आहे.

-----------------

**नांदेड जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त माध्यमिक शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत**

**(३३) * २८५१८ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयात जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षकांची पदे रिक्त असूनही अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षकांचे समायोजन प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) सन २०१६-१७ संचमान्यतेतील ऑनलाईन प्रणालीद्वारे उपलब्ध माहितीच्या अनुषंगाने समायोजन प्रक्रीया पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद येथील दर्गा दाऊद मगरीबी वक्फ मालमत्तेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३४) * २७७१६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **औकाफ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील दर्गा दाऊद मगरीबी वक्फ मालमत्तेवर दिलीप चितलांगे व इतरांनी वक्फ अधिकाऱ्यांशी संगनमत करुन जागा ताब्यात घेतल्याचे न्या. ए.टी. ए.के. शेख यांच्या चौकशी अहवालात सदर मालमत्ता मंडळाकडे पुर्ववत घेण्याबाबत वक्फ अधिनियम १९९५ व वक्फ (सुधारणा) अधिनियम, २०१३ मधील तरतूदीप्रमाणे कारवाई करण्याबाबतची शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मालमत्ता वक्फ मंडळाच्या ताब्यात देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अशंत: खरे आहे. श्री.ए.टी.ए.के.शेख, चौकशी आयोगाने तपासणी केलेल्या प्रकरणांमध्ये प्र.क्र.२ येथे औरंगाबाद येथील दर्गा दाऊद मगरीबी सि.टी.एस.नं.१२५०३ मधील ४४१८.३१ चौ.मी इतकी वक्फ जमीन लीजवर देण्यात आलेल्या प्रकरणाचा समावेश आहे. तथापि, सदर वक्फ मालमत्ता वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार वक्फ मंडळाकडे पूर्ववत करुन घेण्याबाबत न्या.ए.टी.ए.के.शेख, चौकशी आयोगाच्या अहवालामध्ये शिफारस करण्यात आलेली नाही.

(२) श्री.ए.टी.ए.के.शेख, चौकशी आयोगाने अहवालात नमूद केलेल्या प्रकरणांमध्ये तसेच त्याच्याशी समान असलेल्या अन्य प्रकरणांमध्ये बेकायदेशीररित्या विक्री, अदला-बदल इ. झालेल्या वक्फ मालमत्ता, वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या वक्फ मंडळाला सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सदरच्या कामी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाला सहाय्य करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली १ उपजिल्हाधिकारी, २ तहसिलदार आणि २ नायब तहसिलदार यांचा समावेश असलेल्या एका कृती दलाची स्थापना करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सद्य:स्थितीत या कृतिदलासाठी आवश्यक पदनिर्मिती करण्यात आलेली असून, सदर पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासंदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विद्यार्थीनींची पटसंख्या वाढविण्यासाठी उपस्थिती भत्त्यात वाढ करण्याबाबत

**(३५) * २७१७५ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १४८९० ला दिनांक ५ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २३ वर्षापूर्वी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या महत्वाकांक्षी उपक्रमासंदर्भात शिक्षण विभागाने मागासवर्गीय विद्यार्थीनींना प्रतिदिन १ रुपया उपस्थिती भत्ता देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थीनींची पटसंख्या वाढविणे व टिकविण्यासाठी सध्याच्या महागाईनुसार उपस्थिती भत्त्याच्या रकमेत वाढ करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, सदर निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय. शासन निर्णय दिनांक १० जानेवारी, १९९२ अन्वये हा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(२) व (३) उपस्थिती भत्त्याच्या रकमेत वाढ करण्याची बाब विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेमधील मुख्याध्यापक पदास संरक्षण देण्याबाबत**

**(३६) * २९५२६ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये पटसंख्येच्याअभावी दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ व माहे ऑगस्ट, २०१६ च्या शासन निर्णयानुसार मुख्याध्यापकाचे पद कमी करण्याची तरतूद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सम निकष खाजगी संस्थांबाबत नसल्याने मुख्याध्यापकांमध्ये अन्याय व भेदभावाची भावना निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खाजगी संस्थांप्रमाणे सेवानिवृत्तीपर्यंत पदास सुरक्षेची मागणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक ८ जानेवारी, २०१६ व शासन निर्णय दिनांक २ जुलै, २०१६ नुसार शाळेतील पटसंख्या कमी झाली तरी मुख्याध्यापकाचे अन्य शाळेत समायोजन होत नसल्यास सेवानिवृत्तीपर्यंत पदास संरक्षण देण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण लागू करण्याबाबत**

**(३७) * २७५२६ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे विमा संरक्षण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनाही लागू करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहन व इतर अपघातावेळी शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या विमा संरक्षणा इतकेच संरक्षण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनाही देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणी विविध संघटनांकडून केली जात असताना शासन स्तरावर ही योजना प्रलंबित असून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण लागू करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) ते (४) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**मराठवाड्यासह राज्यात स्वच्छ भारत योजना राबविण्याबाबत**

**(३८) * ३०५८० श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मराठवाड्यात स्वच्छ भारत योजना संथगतीने राबवली जात असल्याचे नुकतेच शासनाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडयात स्वच्छ भारत योजनेसाठी तरतुद केलेला निधी पुर्ण खर्च झाला नसूनही स्वच्छ भारत योजना प्रभावीपणे अंमलात न येण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्वच्छ भारत योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) सन २०१२ च्या पायाभुत सर्वेक्षणानंतर मराठवाड्यात सन २०१६-१७ च्या वार्षिक कृती आराखड्यानुसार ४,५२,५१४ इतक्या वैयक्तिक शौचालय बांधकामाचे लक्षांक निर्धारित करण्यात आले होते. दिनांक २२/०३/२०१७ पर्यंत मराठवाड्यात एकूण २,८१,२२५ इतके वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. सदर काम निर्धारित लक्षांकाच्या ६२ % एवढे आहे. सबब योजनेचे काम संथगतीने राबविले जात असल्याचे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अनुदानास पात्र असलेल्या शाळा व वर्ग तुकड्यांना अनुदानाचा वाढीव टप्पा देण्याबाबत

**(३९) * २७३६० श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे : तारांकित प्रश्न क्रमांक २६०२१ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयाने राज्यातील २४५२ तुकड्या व १६२८ शाळा यांना सरसकट २० टक्के अनुदान देण्याबाबत शासन आदेश निर्गमित झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन आदेशामध्ये या शाळा व वर्ग तुकड्या यांना अनुदानाचा पुढील वाढीव टप्पा देण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १७ फेब्रुवारी, २००४ रोजीच्या शासन आदेशाने प्रत्येक वर्षी १ एप्रिलला वाढीव टप्पा दिला जातो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या शासन आदेशाने अनुदानास पात्र असलेल्या शाळा व वर्ग तुकड्यांना अनुदानाचा वाढीव टप्पा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. शासन निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ नुसार सदर शाळांना शासनाच्या पुढील आदेशापर्यंत सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) शासन निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ अन्वये अनुदान सूत्रामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तामसा (जि.नांदेड) ग्रामपंचायतीत भारत स्वजल योजनेंतर्गत पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(४०) * २८०३४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तामसा (जि.नांदेड) ग्रामपंचायतीत भारत स्वजल योजनेंतर्गत पाणीपुरवठा योजना मागील सहा वर्षापासून कार्यान्वित नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.पाणीपुरवठा मंत्री यांनी पत्र देऊनही विभागाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्याविरुध्द कारवाई करुन सदरहू योजना कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) नाही. मौ.तामसा, ता.हदगांव येथील योजना माहे मार्च, २०१२ पासून कार्यान्वित असून पाणीपुरवठा सुरळीत सुरु आहे.

(२) प्राप्त तक्रारीस अनुसरुन अधिक्षक अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त चौकशी समिती नियुक्त करण्यात आली आहे. ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती व संबंधित TSP यांचेकडे पाठपुरावा करुन अभिलेखे उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) चौकशी अहवाल प्राप्त होताच अहवालानुसार दोषींवर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल. सदरहू योजना समितीने माहे मार्च, २०१२ पासून कार्यान्वित करुन पाणीपुरवठा चालू केला आहे.

(४) समितीकडून अभिलेखे उपलब्ध झाले नसल्याने विलंब झाला आहे.

-----------------

**अटलगव्हाण (ता.पाचोरा, जि.जळगांव) गावाच्या**
**राष्ट्रीय पेयजल योजनेची चौकशी करण्याबाबत**

**(४१) * २९६२६ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अटलगव्हाण (ता.पाचोरा, जि.जळगांव) गावाच्या राष्ट्रीय पेयजल योजनेची जिल्हास्तरावरुन चौकशी करण्याची मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) सदरील योजनेची चौकशी उपअभियंता ग्रामिण पाणीपुरवठा जिल्हा परिषद उपविभाग पाचोरा यांनी केली असून योजनेची कामे प्रगतीत असून अनियमितता आढळून आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे दारफळ (सीना) (ता.माढा, जि.सोलापूर) येथील**
**जलस्वराज्य प्रकल्पात अपहार झाल्याबाबत**

**(४२) * ३०७७९ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दारफळ (सीना) (ता.माढा, जि.सोलापूर) येथील नागरीकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत करण्यात आलेले काम निकृष्ट दर्जाचे असून कामात अपहार झाल्याबाबत गावकृती आराखडा अंमलबजावणी दरम्यान करण्यात आलेल्या खर्च व मुल्यांकन याबाबत संबंधित अध्यक्ष/सचिव यांना नोटीस देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपहाराची रक्कम मुदतीत जमा न केल्यामुळे मौजे कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे आदेश गटविकास अधिकारी, पंचायत समिती कुर्डूवाडी, ता.माढा यांना देण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत करण्यात आलेले सदर काम अत्यंत निकृष्ठ दर्जाचे झालेले आहे, हे खरे नाही.

तथापि, कामासाठी झालेला खर्च व मुल्यांकनातील तफावती याबाबत संबंधित अध्यक्ष/सचिव यांना नोटीस देण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) गट प्रमुख यांना दिनांक १५ डिसेंबर, २००८ च्या पत्रान्वये अपहार प्रकरणी संबंधित अध्यक्ष तथा सचिव यांचेविरुध्द गुन्हा दाखल करणेबाबत कळविण्यात आले होते. तथापि, ग्रामस्थ व पदाधिकारी यांनी अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत बैठक घेवून सदरची अपूर्ण कामे मे, २०१० दरम्यान पूर्ण करण्यात आली आहेत.

-----------------

## हिमायतनगर (जि.नांदेड) तालुक्यातील प्राथमिक शाळांमधील शालेय पोषण आहार निकृष्ट दर्जाचा असल्याबाबत

**(४३) * ३०४०५ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिमायतनगर (जि.नांदेड) तालुक्यातील प्राथमिक शाळांमधील मुख्याध्यापकांच्या निष्काळजीपणामुळे विदयार्थ्यांना पुरविला जाणारा शालेय पोषण आहार निकृष्ट दर्जाचा शिजविला जात असल्याने ग्रामिण भागातील विदयार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले असून संबंधित तालुक्याचे गटविकास अधिकारी यांनी सुध्दा संबंधित शाळातील मुख्याध्यापकांवर कोणतीही कारवाई न केल्यामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित मुख्याध्यापकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांचे दफ्तरांचे ओझे कमी करण्याबाबत**

**(४४) * २७२८१ श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक २४२३६ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सर्व शाळांना दप्तरांचे ओझे कमी करण्याच्या सूचना दिलेल्या असल्या तरी दप्तरांचे ओझे कमी झालेले नसून राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांच्या दप्तरांचे ओझे कमी करण्याची जबाबदारी शासनाची असल्यामुळे सर्व पर्यायांचा अवलंब करावा असे आदेश मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिकेच्या सुनावणीच्यावेळी दिनांक २६ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांचे दप्तरांचे ओझे कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) नाही.

मा.उच्च न्यायालयात दिनांक २६ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये त्यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार शासनाने काय कार्यवाही केली याबाबतचा अहवाल सादर करावा असे आदेश दिले आहेत.

(३) दिनांक २१ जुलै, २०१५ रोजी विद्यार्थ्यांनी दप्तराचे ओझे कमी करावयाच्या उपाययोजनेबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे व दिनांक ०५ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन परिपत्रकान्वये संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मराठी भाषा धोरणाचा मसुदा अंतिम करण्याबाबत**

**(४५) * २६९७० डॉ.अपूर्व हिरे : दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक २०७८० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेच्या विकासासाठी दिनांक २२ जून , २०१० च्या शासन निर्णयान्वये विभागांतर्गत कायमस्वरुपी भाषा सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली असून पुढील २५ वर्षातील मराठी भाषेचे धोरण ठरविण्यासाठी या समितीमार्फत सन २०१३ पासून कार्यवाही सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने मराठी भाषा धोरणाचा मसुदा दिनांक १९ ऑगस्ट, २०१४ रोजी शासनास सादर केला असून शासनाच्या संकेतस्थळावर सदरील मसुदा उपलब्ध करून त्यावर प्राप्त सूचना/अभिप्राय विचारात घेवून धोरण अंतिम करण्याची कार्यवाही भाषा सल्लागार समितीमार्फत सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भाषा सल्लागार समितीची दिनांक ५ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयान्वये पुनर्रचना करण्यात येवून सदरील पुनर्रचित समितीकडून मराठी भाषा धोरणाचा मसुदा अंतिम करण्याची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मसुद्याचे संक्षिप्त स्वरुप व मराठी भाषा धोरणाचा मसुदा अंतिम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, कार्यवाही केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३), (४), (५) सदरचे काम अंतिम टप्प्यात सुरू आहे.

-----------------

**दिग्रस (जि.यवतमाळ) येथील स्वस्त धान्य दुकानावर कारवाई करण्याबाबत**

**(४६) * ३०६५९ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिग्रस (जि.यवतमाळ) येथील स्वस्त धान्य दुकानावर शिधापत्रिकाधारकांना धान्य कमी देणे, जादा पैसे घेणे व मर्जीतील लोकांना धान्य देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक नागरीकांनी तहसिलदारांना निवेदन देऊनही संबंधित दुकानदार मनमानी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्वसामान्यांच्या हक्काचे धान्य देण्याऐवजी मनमानी करणाऱ्या स्वस्त धान्य दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) दिग्रस तालुक्यातील ५ रास्तभाव धान्य दुकानदारांविरुध्द वैयक्तिक तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. तसेच एक तक्रार दिग्रस तालुक्यातील सर्व रास्तभाव धान्य दुकानदारांबाबत प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने तहसिलदार दिग्रस यांनी केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे :-

अ) रामनगर, तालुका दिग्रस येथील रास्तभाव दुकानाचे प्राधिकार पत्र दिनांक ११/७/२०१६ च्या आदेशान्वये निलंबित केले आहे.

ब) दिग्रस येथील श्री.जयराम काळे या रास्तभाव धान्य दुकानदाराच्या प्राधिकार पत्राची १००% अनामत रक्कम दिनांक ९/८/२०१६ च्या आदेशान्वये जप्त करण्यात येऊन सक्त ताकीद देण्यात आली.

क) राहटी, ता.दिग्रस येथील रास्तभाव दुकानदाराच्या प्राधिकार पत्राची ५०% अनामत रक्कम दिनांक २७/१०/२०१६ च्या आदेशान्वये जप्त करण्यात येऊन ताकीद देण्यात आली.

ड) आमला खु., ता.दिग्रस येथील रास्तभाव दुकानदाराचे प्राधिकार पत्र रद्द करण्यात आले.

ई) दिग्रस येथील म.सलीम अ.रहिम यांच्याविरुध्द प्राप्त तक्रारीमध्ये काही तथ्य नसल्याचे आढळून आले.

फ) एक तक्रार दिग्रस तालुक्यातील सर्व रास्तभाव धान्य दुकानदारांबाबत असून त्यात तथ्य नसल्याचे आढळून आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंडवाना (जि.गडचिरोली) विद्यापीठात पुनर्मूल्यांकन पध्दतीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४७) * २७४५२ प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडवाना (जि.गडचिरोली) विद्यापीठात पुनर्मूल्यांकन पध्दतीत गैरव्यवहार झाल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुनर्मुल्यांकन करतांना नापास विद्यार्थ्यांना पास करून देण्यात आल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेतर्फे कुलगुरु यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही, परंतु वर्तमान पत्रात बातमी आलेली होती.

(२) हे खरे नाही.

(३) मा. कुलपती, महोदयांकडे सदर विषयाची प्राप्त झालेली तक्रार विद्यापीठाला दिनांक १६/०१/२०१७ रोजी प्राप्त होताच विद्यापीठाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील तरतुदीनुसार दिनांक २०/०१/२०१७ रोजी प्राधिकरणांतील ३ तज्ञ व्यक्तीची समिती गठीत केली आहे.

सदर प्रकरणाची चौकशी सुरु असुन चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वस्तीशाळा शिक्षकांना/निमशिक्षकांना टीईटीमधून वगळण्याबाबत

**(४८) * २८५१६ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वस्तीशाळा शिक्षकांना/निमशिक्षकांना टीईटीमधून वगळण्याबाबत शासनाने केंद्र शासनाला शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वस्तीशाळा शिक्षकांची मूळ सेवा जोडून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय. परंतु केंद्र शासनाने त्यावर सकारात्मक निर्णय घेतलेला नाही.
(२) व (३) जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत दिनांक ०१/०३/२०१४ च्या शासन निर्णयान्वये प्राथमिक शिक्षक म्हणून सामावून घेण्यात आलेल्या वस्तीशाळा स्वयंसेवक/निमशिक्षकांना, पूर्वीच्या सेवेचे कोणतेही आर्थिक लाभ अनुज्ञेय करण्यात आलेले नसून सदर शाळेत कार्यरत असलेले प्राथमिक शिक्षक आणि शिक्षण सेवक यांच्याखाली शून्य सेवाजेष्ठता देण्यात आलेली आहे. यास्तव वस्तीशाळा शिक्षक म्हणून त्यांच्या मूळ सेवा जोडून घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वाळूंज (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथील वक्फ मालमत्ता ताब्यात घेण्याबाबत**

**(४९) * २७७१५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **औकाफ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळूंज (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथील सर्व्हे नं. २११ मधील ३१ एकर ३५ गुंठे एवढी जागा लीज करार करुन देतांना वक्फ अधिनियम, १९५४ च्या कलम ३६ चे उल्लंघन झालेले असल्याने ती मालमत्ता वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार वक्फ मंडळाकडे पुर्ववत घेण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश न्या. ए.टी.ए.के. शेख यांनी अल्पसंख्यांक विभाग यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नियमांचे उल्लंघन करुन देण्यात आलेल्या जमिनीचा व्यवहार रद्द करून जागा वक्फ मंडळाच्या ताब्यात देण्याबाबत अल्पसंख्यांक विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अशंत: खरे आहे. श्री.ए.टी.ए.के. शेख, चौकशी आयोगाने तपासणी केलेल्या प्रकरणांमध्ये प्र.क्र. ६ येथे वाळूंज, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद सर्व्हे नं.२११ मधील ३३ एकर ३५ गुंठे वक्फ जमीन लीजवर देण्यात आलेल्या प्रकरणाचा समावेश आहे. तथापि, सदर वक्फ मालमत्ता वक्फ अधिनियम,१९९५ मधील तरतुदीनुसार वक्फ मंडळाकडे पूर्ववत घेण्याबाबत न्या.ए.टी.ए.के. शेख चौकशी आयोगाच्या अहवालामध्ये निर्देश देण्यात आलेले नाहीत.

(२) श्री.ए.टी.ए.के. शेख चौकशी आयोगाने अहवालात नमूद केलेल्या प्रकरणांमध्ये तसेच त्याच्याशी समान असलेल्या अन्य प्रकरणांमध्ये बेकायदेशीररित्या विक्री, अदला-बदल इ. झालेल्या वक्फ मालमत्ता, वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्या दृष्टीने वक्फ अधिनियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या वक्फ मंडळाला सूचना देण्यात आलेल्या आहेत, तसेच सदरच्या कामी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाला सहाय्य करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली १ उपजिल्हाधिकारी, २ तहसिलदार आणि २ नायब तहसिलदार यांचा समावेश असलेल्या एका कृती दलाची स्थापना करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सद्य:स्थितीत या कृतिदलासाठी आवश्यक पदनिर्मिती करण्यात आलेली असून, सदर पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासंदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### उल्हासनगर (जि.ठाणे) येथे क्रीडा संकुल उभारण्याबाबत

**(५०) * २७५३६ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील क्रीडा संकुलासाठी शासनाने रुपये १ कोटी रकमेस मंजुरी दिल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात ठाणे जिल्हयाचे मा.पालकमंत्री, संबंधित प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांचेसमवेत आयोजित केलेल्या बैठकीत, क्रीडा संकुल बांधकामाचा प्रस्ताव धर्मादाय आयुक्तांकडे सादर करण्याचे त्याच सुमारास ठरविण्यात आले असून निधी उपलब्ध झाला नसल्याने सदर क्रीडा संकुलाच्या कामास सुरुवात झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर क्रीडा संकुलासाठी निधी मंजूर करुन क्रीडा संकुलाचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. सदर बैठकीमध्ये तालुका क्रीडा संकुल उल्हासनगर करिता दशहरा मैदानाची जागा प्रस्तावित असल्यामुळे धर्मदाय आयुक्त, ठाणे यांच्याकडे समिती गठीत करण्याबाबत नोंदणी करुन त्याची प्रत जिल्हाधिकारी, ठाणे यांना सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.
(३) उल्हासनगर तालुका क्रीडा संकुल समितीच्या नावावर जागा हस्तांतरणाची कार्यवाही जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयाकडून सुरु असून जागा प्राप्त झाल्यानंतर अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन त्यास राज्य क्रीडा विकास समितीच्या बैठकीमध्ये मान्यता घेवून निधी वितरीत करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात नगरपरिषदेमधील शिक्षकांना वैद्यकीय प्रतिपूर्ती खर्च देण्याबाबत

**(५१) * २९५६१ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नगरपरिषदेमधील प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती खर्च देण्याबाबत अमरावती विभाग, शिक्षक आघाडीच्यावतीने प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांच्याकडे निवेदनाद्वारे दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात नगरपरिषदेमधील कार्यरत शिक्षकांना वैद्यकीय प्रतिपूर्ती खर्च देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषदांच्या अखत्यारितील प्राथमिक शाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित होणा-या शासन निर्णयाच्या अधिन राहून वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर करण्यात येते, दिनांक १५/०७/२०१६ च्या शासन निर्णयान्वये रुपये २ लक्ष पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस मंजूरीचे देण्याचे अधिकार संबंधित प्रशासन अधिकारी तसेच रुपये २ लक्ष पेक्षा जास्त व रुपये ३ लक्ष पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजूरी देण्याचे अधिकार संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांना देण्यात आले आहेत.

-----------------

**भुलेश्वर आणि काळबादेवी (मुंबई) परिसरात बनावट सौंदर्य प्रसाधने कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(५२) * २७६१४ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुलेश्वर आणि काळबादेवी (मुंबई) परिसरात विनापरवाना बनावट सौंदर्य प्रसाधने उत्पादन करणाऱ्या कारखान्यांवर अन्न व औषध प्रशासन विभागाने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान छापा टाकून रुपये २ कोटी ३९ लाख २ हजार ६४० बनावट उत्पादने जप्त केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या छाप्यामध्ये लोरिअल, लॅक्मे, फेअर ॲण्ड लव्हली, ओले, रेव्हलॉन, एल १८ व निविया यासारख्या नामांकित ब्रँडच्या उत्पादनांचे साठे आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, कृष्णा कॉस्मेटिक्स, भुलेश्वर व राधे कॉस्मेटिक हे विनापरवाना खरेदी केलेली सौंदर्य प्रसाधने विनादेयकाने विकत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अन्न व औषध प्रशासनाव्दारे दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी छापा टाकून नामांकित कंपन्यांची बनावट व विनापरवाना उत्पादित केलेल्या सौंदर्यप्रसाधनांचा साठा जप्त केला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी कंपनीच्यावतीने कॉपीराईट ॲक्ट, १९६७ मधील कलम ५१ व ६३ च्या उल्लंघनाबाबत पायधुनी पोलीस स्टेशन, मुंबई येथे प्रथम खबर अहवाल क्र. ०४/२०१७, दिनांक १७/०१/२०१७ रोजी नोंदविलेला आहे. प्रशासनाच्या दिनांक १८/०१/२०१७ च्या पत्रान्वये सदरच्या आरोपींनी औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील उल्लंघन केलेल्या कलमातील तरतुदींचाही समावेश त्यांच्याविरूध्द पायधुनी पोलीस स्टेशन, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या प्रथम खबर अहवाल क्र. ०४/२०१७ यात करावा अशी विनंती करण्यात आली आहे.

छाप्याच्या वेळी विश्लेषणासाठी घेण्यात आलेल्या नमुन्यांचे अहवाल विश्लेषणासाठी पाठविण्यात आले आहेत. विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापुर विद्यापीठातील कर्मचा-यांना सेवेचा लाभ देण्याबाबत**

**(५३) * २६८८३ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापुर विद्यापीठामध्ये माहे नोव्हेंबर, २०११ ते नोव्हेंबर, २०१२ या कालावधीत वर्ग १ ते वर्ग ४ अशा एकूण ७६ कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना २ वर्षानंतर दिले जाणारे सेवेतकायम करण्याबाबतचे पत्र, वेतनवाढ आणि पदोन्नती अजूनही दिली नसल्याने उमेदवारांची केलेली भरती प्रक्रिया तपासण्यासाठी सन २०१४ मध्ये निगवेकर समितीची नियुक्ती करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन समितीच्या अहवालानुसार पात्र कर्मचा-यांना सेवेचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सोलापूर विद्यापीठाने केलेल्या नमूद भरती प्रक्रियेबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सदर भरती प्रक्रियेची चौकशी करण्यासाठी दिनांक २८ मे, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये निगवेकर समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशीनुसार दिनांक २१ मार्च, २०१६ रोजीच्या शासन पत्रान्वये सोलापूर विद्यापीठाने भरती केलेली उपकुलसचिव, सहायक कुलसचिव, कक्ष अधिकारी व नळकारागीर हे चार वगळून इतर अधिकारी/कर्मचारी यांची नावे सेवार्थ प्रणालीमध्ये घेणेबाबत संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना शासनस्तरावरुन सूचना देण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार वरील उपकुलसचिव, सहायक कुलसचिव, कक्ष अधिकारी व नळकारागीर यांची चारही प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्यामुळे त्यांचा एच.टी.ई. सेवार्थ प्रणालीमध्ये तात्पुरत्या स्वरूपात समावेश केलेला आहे. उर्वरित सर्व अधिकारी/ कर्मचाऱ्यांचा एच.टी.ई. सेवार्थ प्रणालीमध्ये समावेश करण्यात आलेला असून त्यांचे जून, २०१६ या महिन्यापासून सेवार्थ प्रणालीव्दारे वेतन अदा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुकापूर (ता.पनवेल, जि.रायगड) येथील जय मल्हार इंग्लिश स्कुलमध्ये मुलांवर अन्याय झाल्याबाबत

**(५४) * २९०६४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुकापूर (ता.पनवेल, जि.रायगड) येथील जय मल्हार इंग्लिश स्कुलमध्ये पैसे चोरल्याच्या संशयावरुन इयत्ता चौथीतील विद्यार्थीनी कु. हर्षदा गंगाराम लेंडी हिला मारहाण करुन तिच्या शरीरावर गरम लोखंडी उलथण्याने चटके दिल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुलांना अन्यायकारक वागणूक व मारहाण करणाऱ्या मुख्याध्यापिकेवर व संबंधित शिक्षकांवर तसेच संचालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात संगणक टंकलेखन परिक्षेस उपस्थित असलेल्या विद्‌यार्थ्यांचे नुकसान झाल्याबाबत

**(५५) * ३०६७१ श्रीमती स्मिता वाघ, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात परिक्षा परिषद आणि टंकलेखन संस्था यांच्यात समन्वय नसल्याने राज्यातील ३६५ विद्‌यार्थी संगणक टंकलेखन परिक्षेपासून वंचित राहिल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिक्षेसाठी विद्‌यार्थ्यांनी भरलेले शुल्क व्यर्थ जाणार असून पुन्हा परिक्षा देण्यासाठी त्यांना अर्ज आणि शुल्क भरावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कंधार (जि.नांदेड) तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५६) * ३०७०८ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंधार (जि.नांदेड) तहसिल कार्यालयातील पुरवठा विभाग नियमबाह्य कारभार करीत असून मृत विक्रेत्याच्या नावे पंधरा महिने रॉकेल घेत असून पुरवठा अधिकारीच आपल्या कुटुंबियांच्या नावे अंत्योदय योजनेचा लाभ घेत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१), (२) व (३) होय.

सप्टेंबर, २०१५ ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीमध्ये मृत अर्धघाऊक विक्रेता श्री.पांडुरंग मधुकर महाजन रा.कंधार यांच्या नावे रॉकेलचे नियतन तहसिलदार, कंधार यांचे कार्यालयामार्फत मंजूर करण्यात आले.

श्री.उत्तम सयाजी निलावाड, नायब तहसिलदार, कंधार यांच्या वडिलांच्या नावे अंत्योदय शिधापत्रिका वितरीत करण्यात आलेली आहे. त्यामध्ये नायब तहसिलदारांच्या नावाचा समावेश आहे.

उक्त बाब शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी, नांदेड व तहसिलदार, कंधार यांना दिनांक २५/३/२०१७ अन्वये, कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहे. संबंधितांविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावित आहे.

-----------------

## मराठी संशोधन मंडळास अनुदान मंजूर करण्याबाबत

**(५७) * २७२८८ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयांतर्गत येणारे मराठी संशोधन मंडळ मागील ७० वर्षापासून मराठीतील विविध विषयांचे संशोधन, संदर्भ लेखन, संबंधित पुस्तकांचे प्रकाशन करीत असून अनेक महत्वाचे प्रकल्प हाती घेतलेले आहेत, परंतू त्यांना शासनाकडून अनुदान मिळत नसल्यामुळे अनुदानाअभावी संशोधन थांबविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकल्पांना किती अनुदान देण्यात आले, तसेच शासनाने चौकशी करुन अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

मराठी संशोधन मंडळाच्या संशोधन संस्था ग्रंथालयास शासन मान्यता आहे. ग्रंथालय संचालनालयाकडून संशोधन संस्थेच्या ग्रंथालयास महाराष्ट्र ग्रंथालये (संशोधन आणि साहित्यिक परिसंस्थेच्या ग्रंथालयास सहाय्यक अनुदानासाठी मान्यता) नियम, १९७४ या मधील तरतुदींनुसार अनुदान मंजूर करण्यात येते. संशोधन संस्थेच्या ग्रंथालयासाठी मान्य खर्चाच्या बाबींमध्ये संशोधनासाठीच्या खर्चाचा समावेश नाही.

(२) ग्रंथालयाचा वार्षिक अहवाल व लेखा परिक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर ग्रंथालयास अनुदान प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात येते.

मराठी संशोधन मंडळ, मुंबई या संस्थेने ग्रंथालयाचा नियमित वार्षिक व अंकेक्षण अहवाल जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयास सादर केलेला नाही. त्यामुळे ग्रंथालयास वार्षिक परिरक्षण अनुदान वितरित केलेले नाही. ग्रंथालयाचे वार्षिक अहवाल आणि लेखापरिक्षण अहवाल आवश्यक कागदपत्रांसह सादर केल्यास तपासणीअंती नियमानुसार वार्षिक परिरक्षण अनुदान अदा करणे शक्य होईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात येत आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.